८८५०

जा.क्र. माध्य.३(  )/प्रथम मान्यता/पुवि/२००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 29 JUN 2001

माध्यम : मराठी
विनाअनुदान तत्वावर मान्यता.

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता...
शाळा श्री. विझाई देवी हायस्कूल, ताम्हीणी ता. मुळशी

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक : शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा/२०००-२००१, दि. २३.५.०१
२. या कार्यालयाचे परवानगी पत्र क्र. माध्य-३/९३/नमाशा/मान्यता/३२१८,/पुवि/०१, दि. १३.३.०१
३. शासनपत्र क्र. नमाशा/४३९/२०००/माशि-१, दि. ३१.८.२०००

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये सहयाद्री शिक्षण संस्था, ताम्हीणी ता. मुळशी संस्थेच्या श्री. विझाई देवी हायस्कूल ताम्हीणी ता. मुळशी माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/९ वी व १० वी च्या वर्गास २०००-२००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटोंची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटोंची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. समितीची स्थापना करावी.
१५. अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर असावा.

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

श्री. विझाईदेवी हायस्कूल,

यशवंतराव चव्हाण भवन
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/~~२२-२३~~ २००१-०२
पुणे, दि. २०/३/२००२.

प्रति,

सचिव,

सह्याद्री शिक्षण मंडळ, ताम्हिणी.

ता. मुळशी.

<u>विषय</u> :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता. २००१-०२

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या श्री विंझाईदेवी हायस्कूल, ताम्हिणी. या माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी च्या वर्गास मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे आदेश क्र. माध्य३/९४/नमाशा/मान्यता/पूवि/३२१८/०१ दि. १३/३/०१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२. नुसार उपरोक्त शाळेस जून २००१ पासून इ. ९वी च्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१] स्वतंत्र प्रयोगशाळा, इमारत असावी.

२] पुरेशा प्रमाणात फर्निचर उपलब्ध असावे.

३] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय असावी.

४] विद्यार्थ्यांचा विविध परीक्षा-स्पर्धा यात सहभाग

५] असावा.

६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिपणी.

J.N.H...

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता

प्रत,

१. मुख्याध्यापक,

श्री विंझाईदेवी हायस्कूल, ताम्हिणी.

ता. मुळशी. जि. पुणे.

२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./०२-०३.
पुणे, दि. २५।७।०२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~श्री विंझाईदेवी हायस्कूल, ताम्हीणी~~

ता. मुळशी . जि. पुणे.

विषय :- इ. १०वी वर्गास प्रथम मान्यता सन २००२-०३.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील पत्र क्र.माध्य-३/प्रथम मान्यता/पुव/सा.क्र./२००२-०३, दि.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या श्री विंझाईदेवी हायस्कूल, ताम्हीणी ता.मुळशी, जि.पुणे ह्या मराठी /इंग्रजी/उर्दू माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इ. १० वीच्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देणेत येत आहे.

१. शैक्षणिकदृष्टया योग्य, पुरेशी व संस्थेच्या मालकीची इमारत असावी.
२. स्वतंत्र प्रयोगशाळा व पुरेसे विज्ञान साहित्य उपलब्ध करणेत यावे.
३. स्वतंत्र ग्रंथालय व पुरेसे ग्रंथ उपलब्ध करणेत यावेत.
४. क्रीडा साहित्य, शैक्षणिक साहित्य, कार्यानुभव साहित्य पुरेसे असावे.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर असावे. कार्यालयीन फर्निचर असावे.
६. पुरेशी विद्यार्थी संख्या असावी.
७. पुरेशा प्रमाणात प्रशिक्षित शिक्षक नियुक्त करणेत यावेत.
८. मुख्या.पदी पात्र, अनुभवी व माध्यमिकसाठी स्वतंत्र मुख्याध्यापक असावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्य.शाळा संहिता नियम ८३ नुसार असावे.
१०. विद्यार्थ्यांचा अभ्यासेतर कार्यक्रमात सहभाग असावा.
११. अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर असावा.
१२. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय असावी.
१३. स्वतंत्र संगणक कक्ष असावे.
१४. शालेय समितीची, पालक शिक्षक संघाची स्थापना करून इतिवृत्त ठेवावे.
१५. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करणेत यावी.
१६. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.सेवानोंद पुस्तके ठेवावीत.
१७. या कार्यालयाकडून सेवक संच निश्चिती करून घेणेत यावी.
१८. कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडणेत यावीत.

" यशवंतराव चव्हाण भवन "
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [ माध्यमिक ]
जा.क्र. शिक्षण/माध्य/इ-४ ने. वाढ/२००१-०२
पुणे, दि. ४/६/२००१

प्रति,

मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,

विंझाईदेवी हायस्कूल , ताम्हिणी.
ता. मुळशी.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणे बाबत. सन १९९७-९८ २००१-०२
इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या सह्याद्री शिक्षण मंडळ, ताम्हिणी द्वारा संचालित विंझाईदेवी हायस्कूल, ताम्हिणी माध्यमिक शाळेतील इ.८ वी / इ. ५ वी चे वर्गास [ माध्यम मराठी / इंग्रजी ] सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्यम / ३ [१४]/ नमाशा / मान्यता / पुवि /३२९६/२००० दि. १३/३/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००१ - २००२ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी जि.प.पुणे / गट शिक्षणाधिकारी, पं. सं. मुळशी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करून घेऊन तपासणी अहवाल या कार्यालयाकडे त्वरित सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे - १० यांचे कार्यालयाशी सकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे सादर करणे बाबत संपर्क साधावा.

J.N.H

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]

जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा./०२-०३

पुणे, दि. ६/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

विंझाईदेवी माध्यमिक विद्यालय, ताम्हीणी

ता. मुळशी.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३

~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, ~~इ. ९ वी~~, इ. १० वी.

आपल्या सह्याद्री शिक्षण मंडळ ताम्हीणी

या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित विंझाईदेवी माध्यमिक विद्या ताम्हीणी

माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी /~~इ. ९ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/३२९८/००, दि.१२/३/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे / गट शिक्षणाधिकारी, पं.स. मुळशी यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

J.N.Hande

शिक्षणाधिकारी[माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.